## महाराष्ट्रात मुख्यत: आढळणारे विषारी साप कोणते?



नाग / पांढ-या / नागसाप

- फणा आणि डोक्यावरील U आकाराचे चिन्ह बघून लवकर ओळखता येतो
- लाकडी कपा-यात, अडगळीत, छोट्या गवतात आणि गोठ्यात आढळतो
- चावल्यावर लगेच वेदना होतात आणि चावल्याच्या ठिकाणी सूज येऊन तो भाग काळा पडतो
- शरीराला लकवा मारतो, श्वास घ्यायला त्रास होतो आणि उपचार न मिळाल्यास रुग्ण दगाऊ शकतो

- पावसाळी छोटे खड्डे, कपारी, फटींमध्ये पावसाळ्यात आढळतो
- बाथरूम मधील पाईप, दरवाज्यातील फट किंवा छिद्रातून रात्री घरात घुसतो
- रुग्णाला सकाळी उठल्यावर तीव्र पोटदुखी आणि उल्टी होते
- त्यासोबत थकवा, बोलायला त्रास होणे, मान उचलायला आणि धरून ठेवायला न जमणे, लाळ गळणे आणि श्वास घ्यायला त्रास होणे आदी लक्षणे दिसतात



मण्यार / चूर / गाठ्या / सतपाळ



घोणस / कांबळ्या

- जाड साप जो प्रेशर कुकर च्या शिट्टीसारखा आवाज काढतो
- ऊस, सोयाबीन आणि कापसाच्या शेतात लपतो
- दंशाच्या ठिकाणी मोठी जखम होते. जखमेभोवती सूज येते, रक्त वाहते आणि तीव्र वेदना होतात
- जखम बरी नाही झाली तर तो भाग सडतो आणि शस्त्रक्रिया करून कापून टाकावा लागतो
- तोंडातून, लघवीतून, संडासमधून देखील रक्तस्त्राव होऊ शकतो

- छोटा साप जो उंच गवत, लाकडांचा ढीग आणि अडगळीत लपलेला असतो
- गवतातून चालत असताना चप्पल घातलेली नसेल तर हा साप चावतो
- पिडीताला काटा रुतल्यासारखी जाणीव होते आणि त्यामुळे त्याच्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही
- थोड्यावेळात चावल्या ठिकाणी सूज येते आणि रक्त वाहते
- तोंडातून, लघवीतून, संडासमधून देखील रक्तस्त्राव होऊ शकतो



फुरसा / फोडसा / वटा-या

तुम्हाला साप चावला तर पहिले सापापासून हळूच दूर व्हा आणि मदतीसाठी लगेच हाक मारा.साप चावल्यावर धावत किंवा जोरात चालत घराकडे जाऊ नका

## महाराष्ट्रात मुख्यत: आढळणारे बिनविषारी साप कोणते?



मांज-या साप



तस्कर साप



हरणटोळ



धामण



कवड्या साप



मांडूळ / मंडूल



नानेटी / नानेटा



दिवड / पानदिवड



अजगर

साप विषारी असो किंवा बिनविषारी, दंश झाल्यावर लगेच जवळच्या रुग्णालयात घेऊन जावे आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार वागावे

## सापांच्या लपण्याच्या जागा कोणत्या असतात?















काही सापांचा दंश झाल्यावर डास चावल्यासारखे किंवा छोटा काटा रुतल्यासारखे जाणवते म्हणून त्याच्याकडे दुर्लक्ष होऊ शकते.
म्हणून साप लपतात अशा ठिकाणी जाताना नेहमी सावध असावे

## सर्पदंश टाळण्यासाठी काय उपाययोजना करता येतील?



गवतातून चालण्याआधी काठी हलवून अंदाज घ्यावा



पोहताना सावध रहावे



झोपताना मच्छरदाणीचा वापर करावा



रात्री टॉर्चचा वापर करावा



दाट झाडीतून चालणे शक्यतो टाळावे



आपले घर आणि आंगण स्वच्छ ठेवावे



काम करताना गम बूट वापरावे

सर्पदंश प्रतिबंध सोपे आणि स्वस्तदेखील आहे.
सर्पदंश रोकथाम करण्यासाठी वर चित्रांत दाखवल्याप्रमाणे काळजी घ्यावी

## सर्पदंश झाल्यावर कोणती लक्षणे दिसतात?


खाली दिलेली लक्षणे सर्पदंशानंतर अंदाजे १५ मिनिटांपासून १० तासांपर्यंत दिसून येतात. सर्पदंश झालेल्या व्यक्तीला खालीलपैकी कोणतीही लक्षणे दिसल्यास ताबडतोब डॉक्टर उपलब्ध असलेल्या आरोग्य सुविधेमध्ये घेऊन जावे


पोटात दुखणे


उलट्या होणे



हगवण लागणे


खूप घाम येणे


तोंड, लघवी किंवा संडासवाटे रक्त जाणे


दंशाच्या ठिकाणी सूज येणे


श्वास घ्यायला त्रास होणे


डोळे उघडे न ठेवता येणे


बेशुद्ध होणे

**सर्पदंश झाल्यावर लक्षणे दिसण्याची वाट बघत बसू नये. पीडित व्यक्तीला लगेच रुग्णालयात घेऊन जावे**

## सर्पदंश झाल्यावर लगेच काय करायला पाहिजे?



सर्पदंश झालेल्या व्यक्तीला हळूच सापापासून दूर घेऊन जा


सर्पदंश पीडित व्यक्तीला धीर द्या आणि शांत करण्याचा प्रयत्न करा



सर्पदंश पिडीत व्यक्तीला जोरात चालू किंवा धावू देऊ नका


सर्पदंश पीडित व्यक्तीला काहीही खायला प्यायला देऊ नका


सर्पदंशाच्या ठिकाणी सूज येऊ शकते. तर बूट, अंगठ्या, जोडवे, मनगटाचे घड्याळ, ब्रेसलेट किंवा घट्ट कपडे शक्य तितक्या लवकर काढले पाहिजेत (वरील चित्र बघा)




सर्पदंश झालेल्या भागाला लाकडी काठी किंवा फांदी बांधून वर चित्रात दिल्याप्रमाणे स्थिर करावे.
रक्तप्रवाह बंद होईल एवढे घट्ट बांधू नये



सर्पदंश झाल्यानंतर पट्टी बांधण्याची योग्य पद्धत



पीडित व्यक्तीला मोटारसायकलवरून रुग्णालयात नेण्याची योग्य पद्धत


**चावणारा प्रत्येक साप हा विषारी नसतो. त्यामुळे सर्पदंश पीडित व्यक्तीला धीर देऊन शांत करणे खूप महत्त्वाचे आहे**


## सर्पदंश झाल्यावर लगेच काय करायला पाहिजे?





सापाला शोधण्यात / पकडण्यात / मारण्यात वेळ घालवू नये


दंश झालेल्या ठिकाणी ब्लेड किंवा चाकू ने त्वचा कापू नये किंवा चिरा मारू नये


दंश झालेल्या ठिकाणाहून तोंडावाटे विष ओढून काढण्याचा प्रयत्न करू नये

**सर्पदंश झाल्यावर मृत्यू होण्याची काही कारणे –**

- साप ओळखता न येणे किंवा चुकीची ओळख करणे
- लक्षणे दिसण्याची वाट बघत बसणे
- वैज्ञानिक दृष्ट्या सिध्द नसलेले औषधोपचार घेण्यात वेळ घालवणे
- रक्ताचा प्रवाह बंद होईल एवढी घट्ट दोरी दंश झालेल्या जागे भोवती बांधणे
- रुग्णवाहिका वेळेत न येणे किंवा रुग्णालयात पोहोचायला उशीर होणे
- रुग्णालयात डॉक्टर नसणे किंवा सर्पदंश विरोधी औषध उपलब्ध नसणे

योगदानकर्ते: डॉ. हृषिकेश मुनशी, शास्त्रज्ञ सी (वैद्यकीय),
आयसीएमआर – राष्ट्रीय प्रजनन आणि बाल आरोग्य संशोधन संस्था, मुंबई, महाराष्ट्र;
डॉ. हिम्मतराव बावस्कर, महाड, जिल्हा रायगड, महाराष्ट्र

आभार: डॉ. सदानंद राऊत, नारायणगाव, जिल्हा पुणे, महाराष्ट्र; डॉ.केदार भिडे, ठाणे, महाराष्ट्र; श्री. मिलिंद गव्हांदे, शहापूर, जिल्हा ठाणे, महाराष्ट्र; श्री गणेश भड, अहेरी, जिल्हा गडचिरोली, महाराष्ट्र; कु. बिजयलक्ष्मी मोहंती, खोरधा, जिल्हा खोरधा, ओडिशा; श्री जगदीश प्रसाद दास, कासीपूर, जिल्हा रायगडा, ओडिशा

ICMR NIRRCH | INSP ICMR National Snakebite Project

# सर्पदंश प्रतिबंध आणि प्रथमोपचार



सर्पदंश प्रतिबंध तसेच सर्पविषाचे परिणाम आणि त्याच्या गंभीर धोक्यांच्या व्यवस्थापनाकरिता आरोग्य यंत्रणेची क्षमता सुधारण्यासाठी आयसीएमआर राष्ट्रीय सर्पदंश प्रकल्प (आयएनएसपी).

मुख्य अन्वेषक: डॉ. राहुल गजभिये, शास्त्रज्ञ ई (उपसंचालक)
आयसीएमआर – राष्ट्रीय प्रजनन आणि बाल आरोग्य संशोधन संस्था, मुंबई

© भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषद, नवी दिल्ली